# परिशिष्ट “एल”

**(नियम १९ पहा)**

**एल (१) संस्था प्रमुखांची कर्तव्ये :-**

१) संस्थेतील सर्व कामासाठी आणि अध्यापनासाठी जबाबदार राहणे.

२) संस्थेतील विद्यार्थ्यांना निदेश देणे.

३) प्रवेश आणि परीक्षा या संबंधातील सर्व कामासाठी जबाबदार राहणे.

४) संस्थेचा पत्रव्यवहार पार पाडणे.

५) सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तातडीने मागविण्यात आलेली माहिती पुरविणे.

६) संस्थेचा अभिलेख तयार ठेवणे (नियम क्र. २२ पहा.)

७) निदेशक आणि अन्य कर्मचारी वर्गाच्या कामाचे पर्यवेक्षण करणे.

८) विद्यार्थ्यांच्या शिस्तीवर लक्ष ठेवणे.

**एल (२) निदेशकाची कर्तव्ये :**

१) संस्थेतील विद्यार्थ्यांना निदेश देणे.

२) संस्था प्रमुखाने प्राधिकृत केले असेल तर संस्थाप्रमुखाच्या अनुपस्थितीत संस्थेचे सर्व कामकाज पाहणे.

३) त्यांच्या प्रभाराखालील तुकड्यातील विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करणे.

४) वर्गाच्या परीक्षा संचालनात संस्था प्रमुखास मदत करणे.

५) याशिवाय संस्थाप्रमुख सोपवतील अशी कामे करणे.